RESEARCH FRONT

**ISSN**
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# कोल्हापूर जिल्हयातील नंदवाळ : एक धार्मिक पर्यटन स्थळ

**डॉ. विकास मोहन सरनाईक**
इतिहास विभाग,
छत्रपती षिवाजी कॉलेज, सातारा

पर्यटन हा आधुनिक काळातील सर्वात झपाटयाने विकसित होणारा व्यवसाय आहे. दळणवळणाच्या सेवा–सुविधा, निवासाची व आरोग्याच्या सुविधा, शासनाची सकारात्मक भूमिका इत्यादीमुळे विकसित व विकसनशिल राष्ट्रात 21 व्या शतकात पर्यटन व्यवसायात खूप विकास झाला आहे. पर्यटन विषेषतः धार्मिक क्षेत्रातील पर्यटन हे भारतात प्राचीन काळापासूनच दिसून येते. कारण प्राचीन काळात हिंदू, बौध, जैन अशा विविध धर्मांचा व त्या धर्माशी संबंधित विविध पंथ, देव–देवतांचा उदय होवून त्यांची मंदिरे, मठ, स्तूप यांची मोठया प्रमाणावर निर्मिती झाली. या धार्मिक स्थळांना प्राचीन काळातही विविध देश–विदेशातून पर्यटक भेटी देत. या पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी विशिष्ठ व प्रशिक्षित मार्गदर्शकांचेही उल्लेख मिळतात.[1] प्राचीन काळातील या धार्मिक पर्यटनाची परंपरा आज 21 व्या शतकातही अखंड आहे. पर्यटन  क्षेत्राचे वाढते महत्व लक्षात घेवूनच महाराष्ट्र सरकारने 2011 हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणूनही साजरे केले. ज्यामधून धार्मिक, सांस्कृतिक, नैसर्गिक इ. विविध पर्यटन क्षेत्रास चालना मिळाली. या शोधनिबंधासाठी संशोधकाने ऐतिहासिक संशोधन पध्दती, संदर्भग्रंथ पध्दती, मुलाखती, सर्वेक्षण, प्रत्यक्ष भेट, वृत्तपत्रे, इंटरनेट या विविध संशोधन पध्दती व साधनांचा वापर केला आहे. या सर्व पार्श्वभूमिवर प्रस्तूत शोधनिबंधात 'कोल्हापूर जिल्हयातील नंदवाळ : एक धार्मिक पर्यटन स्थळ' या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

पर्यटन म्हणजे काय? व त्याची नेमकी व्याख्या काय? हे प्रथम स्पष्ट होणे गरजेचे आहे. वास्तविक पाहता पर्यटन (Tourism) ही संज्ञा 'प्रवास' या शब्दाशी संबंधीत आहे आणि 'प्रवास' (Tour) हा शब्द लॅटीन भाषेतील (TORNOS) या शब्दापासून आला आहे. याचा अर्थ वर्तूळाकार असा आहे. म्हणजेच वर्तुळाकार प्रवास किंवा पॅकेज टूर्स हा शब्द रूढ झाला.[2]

## नंदवाळचे भौगोलिक स्थान

हे ठिकाण महाराष्ट्राच्या कोल्हापूर जिल्हयातील करवीर तालूक्यात आहे. कोल्हापूर शहराच्या दक्षिणेस 10 कि.मी. अंतरावर आहे. या गावाचे भौगोलिक क्षेत्रफळ 1718.8 चौ.कि.मी. असून हे $16^0$ 37′ 35′′ उत्तर अक्षांस व $74^0$ 11′0′′ पूर्व रेखारवृतावर आहे. या गावची लोकसंख्या 2011च्या जनगननेनुसार 1744 आहे.[3]

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115







www.indiamapped.in [4]

**नंदवाळ गावातील धार्मिक पर्यटन स्थळे :**

नंदवाळ या गावचा प्राचीन उल्लेख 'नंदग्रामी' असा आहे. या गावास विठ्ठालाच्या वास्तव्याने महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळेच या गावास 'प्रति पंढरपूर' असेही संबोधतात. या ठिकाणी विठ्ठल मंदिर व शंकराचे पवित्र स्थान 'भिमाशंकर' ही दोन पवित्र धार्मिक स्थळे आहेत.

**1) विठ्ठ मंदिर :** विठ्ठल हा विष्णुचा अवतार मानला जातो. विठ्ठलाचे मुळ ठिकाण नेमके महाराष्ट्र की कर्नाटक यामध्ये संशोधकात मतभेद असले तरी पंडरंग याचा अर्थ कानडी भाग यावरूनच पांडूरंग म्हणजेच विठ्ठल असे मानण्यास हा मुळ कन्नड/कर्नाटकी मानला जातो.[5] मात्र विठ्ठलाचा निश्चित नामोल्लेख शिलालेख किंवा ताम्रपंटामध्ये 1159 च्या आधी मिळत नाही. त्यामुळे विठ्ठलाचा उदय नेमका केंव्हा झाला याबाबत संशाधेकात विविध मतांतरे आहेत.[6] नंदवाळ येथील पांडूरंग/विठ्ठल याबाबतही याची उत्पत्ती नेमकी केंव्हा झाली हे सांगता येत नाही. मात्र करवीर महात्म्यामधील 47व्या आध्यायात 32 युगी विठ्ठल असे येथील विठ्लास म्हटले आहे.[7] तर पंढरीचा पांडूरंग/विठ्ठल याला नामदेवाने त्यांच्या आरतीमध्ये 28 युगी म्हटले आहे.[8]

अशा या प्राचीन देवतेच्या उपासनेसाठी नंदवाळमध्ये हेमाडपंथी दगडी मंदिर आहे. या मंदिरामध्ये पांडूरंग/विठ्ठल हा रोज रात्री वस्तीस असतो असी अख्याईका सांगितली जाते व तसे उल्लेखही करवीर महात्म ग्रंथात मिळतात. त्यामुळेच या ठिकाणास प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाते. पंढरपूर प्रमाणेच नंदवाळ येथेही सर्व सन–उत्सव जे विठ्ठलाशी संबंधीत आहेत ते साजरे होतात. येथेही रिंगण सोहळा, दिंडी सोहळा मोठयाप्रमाणात साजरा केला जातो.

**2) भिमाशंकर :** हे ठिकाण नंदवाळ गावच्या पूर्वेस आहे. हे शंकराचे देवस्थान असून येथे प्राचीन महादेव लिंग आहे. हे लिंग सखल भागात असून त्यावरून पाणी वाहत असते. या ठिकाणाबाबत अख्यायिका सांगितली जाते की येथून एक गुप्त नदी वाहत आहे.[9] या ठिकाणचे महात्म्य खूप प्रसिध्द

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

असल्याने दर श्रावण सोमवारी येथे मोठी यात्रा भरत असते. याच ठिकाणी एक छोटा तलाव असून त्याचे नाव 'भिमाशंकर' तलाव असे आहे. वास्तविक पाहता ज्या ठिकाणी विठ्ठलाचे मंदिर असते त्या ठिकाणी शंकराची पिंड असते व प्रथम शंकराचे दर्शन घेवून नंतर विठ्ठलाचे दर्शन घेतले जाते. आजही ही परंपरा पंढरपूर येथे पहावयास मिळते.[10]

एकंदरीत नंदवाळ हे गाव प्राचीन धार्मिक परंपरेचा वारसा लाभलेले गाव म्हणून नावारूपास येत आहे. त्यामुळे श्रध्दाळू भक्त–भाविकांचे या ठिकाणी भेटीचे प्रमाणही सातत्याने वाढत आहे. याची दखल महाराष्ट्र शासनाने घेवून याला पर्यटनाचा 'ब' दर्जा दिला असून या अंतर्गत मंदिर व परिसरात मोठया प्रमाणावरती सुधारणा सुरू आहेत. या ठिकाणी भेटी देणाऱ्या पर्यटकांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे.

**मागील पाच वर्षातील पर्यटकांची संख्या**

| वर्ष | आषाढीवारी | माघवारी | चैत्रवारी | कार्तिकवारी |
|---|---|---|---|---|
| 2010 | 2,30,000 | 19,000 | 16,000 | 21,000 |
| 2011 | 2,70,000 | 20,000 | 17,000 | 21,500 |
| 2012 | 3,00,000 | 22,000 | 20,000 | 23,000 |
| 2013 | 3,50,000 | 23,000 | 21,500 | 25,000 |
| 2014 | 4,50,000 | 25,000 | 23,000 | 30,000 |

(संदर्भ : सर्वेक्षण, मुलाखत, दै.पुढारी 10 जुलै, 2014)[11]

वरील कोष्टकावरून समजते की, पर्यटकांचा सदर धार्मिक ठिकाणांना भेटी देण्याची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र ही वाढ फक्त ठराविक दिवशीच आहे. ज्यावेळी एकादशी असते त्याच वेळी या ठिकाणी पर्यटक येतात इतर दिवसी मात्र ही संख्या रोढावताना दिसून येते. याची थोडक्यात कारणे पूढीलप्रमाणे सांगता येतील. 1) दळणवळण साधनांचा अभाव–शहरापासून केवळ 10 कि.मी. अंतराव असूनही साधी (K.M.T.) स्थानिक बस सेवा नाही. 2) मंदिरामार्फत पार्किंग, आरोग्यासाठी शैचालये, मुतारी यांची सोय नाही. 3) पर्यटक/भक्तासाठी निवास, भोजनालय, हॉटेल, लॉजिंगचीही गावात सेवा–सुविधा नाहीत. 4) नंदवाळच्या प्रसिध्दीसाठी लागणारे बळ ग्रामपंचायत व कोल्हापूर जिल्हा प्रषासनाकडून कमी पडत आहे. त्यामुळे या ठिकाणची ओळख अत्यल्प नागरीकांनाच आहे. परिणामी या ठिकाणाकडे पर्यटकांचा ओढा कमी आहे.

पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विभाग व जिल्हा प्रशासनानेही काही प्रयत्न करणे गरजेचे आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने 1) दळणवळण व वाहतूक सुधारणा 2) पर्यटन खात्याअंतर्गत जास्ती–जास्त निधी उपलब्ध करून निवास, भोजन, व आरोग्याच्या प्राथमिक सुविधा पुरविणे. 3) नंदवाळचे महत्व प्रसारमाध्यमाद्वारे जाणीवपूर्वक प्रसिध्द करणे. 4) नंदवाळच्या आजूबाजूचे पर्यटन स्थळांची माहिती सांगून त्याची सूची तयार करावी. ज्यामूळे पर्यटकांना एकाच वेळी अनेक स्थळांचा लाभ घेता

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

येईल. या बाबींच्या पूर्ततेनंतर निश्चितच नंदवाळ गावास भेटी देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढण्यास निश्चितच मदत होईल.

एकंदरीत पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे नंदवाळमधील तरूण युवक–युवती व नागरिकांना लॉजिंग, हॉटेल्स, दुकाने, हॉस्पिटल्स, वाहतूक–व्यवस्था, इतर दुय्यम सेवांच्या माध्यमातून रोजगार निर्माण होण्यास मदत मिळेलच तसेच जिल्हयाच्या व राज्याच्याही आर्थिक उत्पन्नात निष्चितच भर पडेल.

**संदर्भ :**

1) Kabia S.K., ‘Tourism Industry’, Reference Press, New Delhi, 2005, p-293.

2) Ratnadip Shing, Toursm Today, Vol.I, Delhi, 1994, p.10.

3) www.cencus.2011.co.in

4) www.indiamapped.in

5) ढेरे, रा.चि., ‘श्री विठ्ठल एक महासमन्वयक’, पुणे, 1983, पृ. 38.

6) कित्ता, पृ. 41.

7) जोषीराव दाजीबा, ‘करवीर महात्म्य’, मीनल प्रकाषन, 1993, अध्याय 47.

8) ढेरे, रा. ची., उपरोक्त, पृ. 55.

9) मुलाखतः दत्तात्रय महादेव वागवे (गुरव, विठ्ठल मंदिर), दि. 22.10.2015, सकाळी11:30.

सुनिता सुभास पाटील (सरपंच), दि. 22/02/2015, सकाळी : 10:00 स्थळः ग्रामपंचायत.

10) ढेरे, रा.चि., उपरोक्त पृ. 42.

11) दैनिक पुढारी, 10 जुलै, 2014, (कोल्हापूर टूडे)